तात्काळ/कालमर्यादा/महत्वाचे

क्र. पोमसं/३१/३९-१/घबांअ/२०१८-१९/७२/२०१८ मुंबई, दिनांक ०५/०२/२०२१

आदेश

*****

शासन निर्णय गृह विभाग क्र. बीयुडी १०२०/प्र.क्र.११०/आस्था-१, दिनांक ०४ डिसेंबर २०२० अन्वये सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षासाठी शासनाने एकुण रु.२५,००,००,०००/- (रु. पंचवीस कोटी फक्त) एवढी तरतुद पोलीस महासंचालक , कार्यालयास मंजूर केली असून २५ टक्के च्या प्रमाणात अंदाजे रुपये ६,००,००,०००/-(अक्षरी रु. सहा कोटी फक्त) घरबांधणी अग्रीमाकरिता बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन दिले आहेत. सदर आदेशान्वये रु.८४,१४,५००/-(अक्षरी रुपये चौऱ्याऐंशी लाख चौदा हजार पाचशे फक्त) एवढया रकमेस मंजूरी देण्यात येत आहे. विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखांनी केलेल्या मागणीनुसार त्यांना देण्यात आलेल्या जिल्हा कोषागार, आहरण व संवितरण क्रमांक या खाली स्वतंत्रपणे अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्यात येत आहे.

२. सोबतच्या विवरणपत्रातील अ.क्र. १ ते ०३ वरील अग्रीमधारकांना त्यांनी मागणी केल्यानुसार संपुर्ण रु. ४७,३८,०००/- रक्कम वितरीत करण्यात येत आहे. अ.क्र. ०४ व ०५ वरील अग्रीमधारकांना पहिल्या हप्त्याची रक्कम रु. १२,००,०००/- वितरीत करण्यात येत आहे. अ.क्र. ०६ व ०७ वरील अग्रीमधारकांना दुसऱ्या हप्त्याची रक्कम रु.१३,३४,४००/- वितरीत करण्यात येत आहे. अ.क्र. ०८ व ०९ वरील अग्रीमधारकांना तिसऱ्या हप्त्याची रक्कम रु.११,४२,१००/- वितरीत करण्यात येत आहे. एकुण रक्कम रु. ८४,१४,५००/- वितरीत करण्यात येत आहे.

३. सोबतच्या विवरणपत्रातील रकाना क्र. ७ मध्ये दर्शविलेल्या विभाग प्रमुखांनी शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्रक्र-३०/२०१३/विनियम,भाग-२ दि. १७/४/२०१५ अन्वये मुंबई वित्तीय नियम १९५९ अंतर्गत नियमाखाली प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका - १९७८ भाग पहिला उपविभाग - एक मधील अनुक्रमांक ११ नियम १३४ अन्वये संबधित अधिकारी / कर्मचा-यांचे घरबांधणी अग्रिम मंजूर केल्याचे आदेश निर्गमित करावेत.

४. घटक प्रमुखांनी त्यांना वितरीत केलेल्या निधीचा विनियोग संपूर्णत: न केल्यास किंवा निधी व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात, त्यामुळे निर्देश देण्यात येत आहेत. की, कार्यालय प्रमुखांनी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची देयके सादर करुन सदरची देयके दि. **३१.०३.२०२१** पर्यंत कोणत्याही परिस्थितीत पारित करुन घ्यावीत. तसेच संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रीम अदा करणेची सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमुखांची असल्यामुळे त्यांनी सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन या प्रकरणी वैयक्तिकरित्या लक्ष देऊन त्यांचे कार्यालयातील लेखाविषयक कामकाज करणारे लेखा अधिकारी /सहाय्यक लेखा अधिकारी/ लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपूर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात. जेणेकरुन शासनाने चिन्हांकित करून दिलेल्या निधीचा विनियोग पूर्णत: होईल? संबंधीतांना घरबांधणी अग्रिम रक्कम अदा केल्यानंतर त्यांची दिनांकित अदारोल पावती, देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक या कार्यालयास / शासनास व महालेखापाल- १ मुंबई/ महालेखापाल-२ नागपूर/अधिदान व लेखा कार्यालय मुंबई यांना सादर करावा. शासन निर्णय वित्त विभाग दि. २०/०२/२०१५ मधील परि. ८ (८) आणि शासन निर्णय वित्त विभाग क्र.अग्रिम-१०००/प्र.क्र.१३/२०००/विनियम दि. ०५/०९/२००० मधील विहीत नमुन्यात याबाबतची नोंद अग्रीम धारकाच्या सेवापुस्तकात / सेवापटात न चुकता घेण्यात यावी.

५. असेही निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ, महालेखापाल यांचे कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी/ महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण - १४ मधील नियम १५७ च्या परिशिष्ट ३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती, शासनास विहीत मुदतीत पाठविण्यात यावी. शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या निधीनुसार या कार्यालयाने मंजूर केलेल्या अग्रिमाच्या खर्च मेळ्याची प्रमाणित माहिती महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची **संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.** तथापि, त्याप्रमाणे माहिती न पाठविल्यास कार्यालयातील संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करणे भाग पडेल याची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्वीकारण्यात येणार नाही. या कारणामुळे विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

६. शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना अग्रिमाचे **दुबार वाटप** होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला, अन्य विभाग/कार्यालयात बदली झाली तरीही शासन निर्णय वित्त विभाग दि.२०/०२/२०१५ मधील परि.८ (१२) नुसार घरबांधणी अग्रीम रकमेच्या आणि व्याजाच्या नियमीत व योग्य वसुलीसाठी संबंधित अग्रीमधारक स्वत: जबाबदार राहील असे अग्रीमाधारकास अवगत करावे. अर्जदारास मंजूर केलेला अग्रीम ज्या प्रयोजनाकरिता मंजूर केला आहे त्या कारणाकरिताच त्याने खर्च केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र (कंत्राटदार यांची रक्कम मिळाल्याची पावती) या कार्यालयास एक महिन्याच्या आत सादर करावी.

७. सदरचा खर्च सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षातील गृह विभाग मागणी क्र. बी-११ मुख्यलेखाशिर्ष ७६१० - शासकीय कर्मचारी इ.कर्जे मधील गौणशिर्ष २०१- घरबांधणी अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०००८७) अन्वये खर्च करण्यात यावा व वित्तीय वर्ष २०२०-२०२१ च्या मंजूर अनुदानातून करण्यात यावा. सदरचा खर्च याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे याची खातरजमा करण्यात यावी.

(ब्रिजेश सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

अपर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस बिनतारी संदेश, म.राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.राज्य, मुंबई
पोलीस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण/पुणे ग्रामीण /नंदुरबार/बिनतारी संदेश, पुर्व विभाग, नागपूर
प्राचार्य पोलीस प्रशिक्षण, केंद्र जालना/ बाभळगाव लातूर

Deks/thispc/acer d/hba order draft

पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुख्यलेखाशिर्ष -७६१०, शासकिय कर्मचारी इत्यादींना कर्जे, वित्तीय वर्षे २०२०-२०२१
मागणी क्रमांक ११-बी गौणशिर्ष २०१, घरबाधंणी अग्रिम आदेश दि. 05 /01/२०२१

अ.क्र	नाव	सेवार्थ क्रमांक	पदनाम	सेवाभरती दि.	सेवानिवृत्ती दि.	विभाग प्रमुख	घटक कार्यालय	एकुण मंजुर रक्कम	प्रत्यक्ष वितरीत करण्यात येणारी रककम
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१	प्रकाश सिताराम ठाकरे	DGPPSTM७५०५	कश्रेलि	१३.११.२०१४	३१.०५.२०३३	पोलीस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण	पोलीस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण	१८,००,०००/-	१८,००,०००/-
२	रोहिणी गणेश राठोड	DGPRGRF७२०१	कश्रेलि	२१.०२.२००६	३०.०६.२०२३	पोलीस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण	पोलीस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण	१५,००,०००/-	१५,००,०००/-
३	धनजंय सुभाष जगदाडे	DGPDSJM९२०२	कश्रेलि	०६.०४.२०१५	३०.०५.२०५०	पोलीस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण	पोलीस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण	१४,३८,०००/-	१४,३८,०००/-
४	गुलाबसिंग बी वसावे	DGPGBVM८६०१	कश्रेलि	०४.०१.२०१२	२८.०२.२०४६	अपर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस बिनतारी संदेश, म.राज्य. पुणे	अपर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस बिनतारी संदेश, म.राज्य. पुणे	२०,००,०००/-	पहिला हप्ता ६,००,०००/-
५	सिमा उत्तम कोकणी	DGPSUKF७७०१	कश्रेलि	२४.०७.२०१४	३१.०३.२०३५	पोलीस अधिक्षक, नंदुरबार	पोलीस अधिक्षक, नंदुरबार	२०,००,०००/-	पहिला हप्ता ६,००,०००/-
६	वाल्मीक ज्ञानदेव कुदळे	DGPWDKM८१०१	कश्रेलि	१०.१२.२००७	३०.०९.२०४१	पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण	पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण	१९,३६,०००/-	दूसरा हप्ता ७,७४,४००/-

७	मधुकर बापूराव भुतेकर	DGPMBBM७८०२	सहायक स्वयंपाकी	०५.०७.२०११	३१.१२.२०३८	अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.राज्य, मुंबई	पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना	१४,००,०००/-	दूसरा हप्ता ५,६०,०००/-
८	लिंगोजी काशीराम पोकळे	DGPLKPM७८०१	कश्रेलि	१७.०५.२००६	३१.०७.२०३६	पोलीस अधिक्षक, बि.स.पुर्व विभाग, नागपुर	पोलीस अधिक्षक, बि.स.पुर्व विभाग, नागपुर	१८,०७,०००/-	तिसरा हप्ता ५,४२,१००/-
९	राजेंद्र बाबुराव गायकवाड	DGPRBGM७५०१	प्रमुख आचारी	२८.१२.१९९५	३०.०४.२०३५	अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म. राज्य, मुंबई	प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र, बाभळगाव लातुर	२०,००,०००/-	तिसरा हप्ता. ६,००,०००/-
१	**एकूण खर्च (अक्षरी रुपये चौऱ्याऐंशी लाख चौदा हजार पाचशे फक्त)**							८४,१४,५००/-	
२	**सदर आदेश निर्गमित करण्यापुर्वी एकूण खर्च (अक्षरी रुपये चार कोटी चौऱ्याण्णव लाख तेवीस हजार सहाशे शहात्तर फक्त)**							४,९४,२३,६७६/-	
३	**सदर आदेश निर्गमित केल्यास अद्यापपर्यंत एकूण खर्च (अक्षरी रुपये पाच कोटी अठ्ठयाहत्तर लाख अडतीस हजार एकशे शहात्तर फक्त)**							५,७८,३८,१७६/-	
४	**सदर आदेश निर्गमित करण्यापूर्वी उपलब्ध अनुदान (अक्षरी रुपये एक कोटी पाच लाख शहात्तर हजार तीनशे चोवीस फक्त)**							१,०५,७६,३२४/-	
५	**सदर आदेश निर्गमित केल्यास शिल्लक अनुदान (अक्षरी रुपये एकवीस लाख एकसष्ठ हजार आठशे चोवीस फक्त)**							२१,६१,८२४/-	

निधी वितरण २०२०-२१.
मागणी क्र.- बी ११- मुख्य लेखाशीर्ष-७६१०
शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र.- बीयुडी १०२०/प्र.क्र.११०/आस्था-१.
मंत्रालय,मादाम कामा मार्ग,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ४ डिसेंबर,२०२०.

वाचा :-१.शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.- अर्थसं-२०२०/प्र.क्र.६४/अर्थ-३, दि.१६/४/२०२०.
२. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.- अर्थसं-२०२०/प्र. क्र. ६५/अर्थ-३,दि.४/५/२०२०.
३. समक्रमांकाचे शासन पत्र दि.५/१०/२०२०.

प्रस्तावना :-

सन २०२०-२१ वर्षात लेखाशिर्ष ७६१०००८७,५५ कर्जे व आगाऊ खर्च, (घरबांधणी अग्रीम) अंतर्गत रु.१०३.५० कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे.तथापि,कोविड-१९च्या संसर्गजन्य रोगामुळे राज्यात मार्च,२०२० पासून लागू असलेल्या लॉकडाऊनच्या परिस्थितीमुळे सन२०२०-२१ या वित्तीय वर्षात काटकसरीच्या उपाययोजना/ धोरण शासनाने जाहीर केले आहे.

शासन निर्णय :-

सन २०२०-२१ वर्षात लेखाशिर्ष ७६१०००८७,५५ कर्जे व आगाऊ खर्च, (घरबांधणी अग्रीम) अंतर्गत अर्थसंकल्पित निधी रु.१०३.५० कोटीच्या २५% (रु.२५,८७,५०,०००/-) तरतुदीपैकी रु.२.०० कोटी माहे ऑगस्ट मध्ये वितरित केल्याने उर्वरित रु.२३,८७,५०,०००/- (रु.तेवीस कोटी सत्याऐंशी लक्ष पन्नास हजार फक्त) वितरणासाठी उपलब्ध आहे. त्यानुषंगाने सन २०२०-२१ साठी मुख्यलेखाशिर्ष ७६१०,२०१-घरबांधणी अग्रीम या गौणशिर्षांतर्गत विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयांना अर्थसंकल्पीय संगणकप्रणालीद्वारे (डिसेंबर, २०२०अखेर पर्यंत) खर्च करण्यास्तव वितरित करण्यात येत असून उपशीर्ष व बाबनिहाय तरतूदीच्या मंजूर, मागणी व प्रस्तावित २५% च्या मर्यादेत निधी वितरणाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

11.12.2020
श्री. बेळकर

अ. क्र.	नियंत्रक अधिकारी	सन २०२०-२१ साठी अर्थसंकल्पित निधी	मागणी	प्रस्तावित २५% निधी वितरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१.	गृह विभाग (खुद्द)	५००००००	०	०
२.	पोलिस महासंचालक,म.रा., मुंबई	२५००००००	२५००००००	६००००००
३.	महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.	६००००००	०	१००००००
४.	अपर पोलिस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, म.रा.,मुंबई	०	६०००००	०
५.	पोलिस आयुक्त, बृहमुंबई.	५०००००००	०	१२५००००००
६.	अपर पोलिस महासंचालक तथा कारागृह महानिरीक्षक,म. रा.,मुंबई.	७०००००००	०	१७५०००००
७.	महासमादेशक,होमगार्डस, म. रा.,मुंबई	३००००००	०	७५००००
८.	संचालक,नागरी संरक्षण संचालनालय, मुंबई	८००००००	८३०००००	२००००००
९.	परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य,मुंबई.	५००००००	०	१२५००००
१०.	आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,म. रा., मुंबई	३०००००००	०	७५०००००
११.	संचालक,न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,म.रा.,मुंबई.	५०००००००	०	१२५०००००
१२.	संचालक,अभियोग संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई	४००००००	३२२४६००	१००००००
१३.	प्रबंधक,मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुबई.	५००००००	३०२००००	१२५००००
१४.	मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई	०	१२४९०००	०
१५.	सचिव,महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,म.रा.मुंबई.	०	०	०
१६.	राज्य परिवहन अपिल न्यायाधिकरण,मुंबई.	०	०	०
	एकूण	१०३५००००००	२६६४१३६००	२३८७५००००

उपरोक्त तक्त्यामध्ये रकाना क्र.५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सदर निधी गृह विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयाच्या नियंत्रण अधिका-यांना खर्च करण्याच्या अनुषंगाने देण्यात आलेला संकेतांक क्रमांक व कोषागार क्रमांक या खाली स्वतंत्रपणे अर्थसंकल्प संगणकीय वितरण प्रणालीद्वारे (बिम्सद्वारे) वितरीत करण्यात येत आहे.

३. उपलब्ध करुन दिलेल्या वरील रक्कमेचा खर्च ताळमेळ, महालेखापाल यांच्या कार्यालयास नोंदविलेल्या खर्चाशी महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण १४ मधील नियम १५७ च्या परिशिष्ट-३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहित मुदतीत पाठविण्यात यावी. खर्च मेळाची माहिती महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुखांची राहील. उपलब्ध केलेला निधी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२०/ प्र.क्र.६४/अर्थ-३,दि.१६/४/२०२० व शासन निर्णय क्र.:अर्थसं-२०२०/ प्र.क्र.६५/ अर्थ-३,दि.४/५/२०२० तील अटी व शर्तींच्या अधीन राहून खर्च करणे बंधनकारक राहील.

४. मागणी क्र.बी-११,मुख्य लेखाशीर्ष ७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे या लेखाशीर्षाखालील २०१- घरबांधणी अग्रिम या गौणशीर्षनिहाय अग्रिमांची प्रकरणे संबधित नियमांच्या अधीन राहून उपलब्ध निधीच्या मर्यादेत मंजूर करावीत.

५. सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.२४१/२०२०/व्यय-८,दि.१३/११/२०२० अन्वये प्रदान केलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(नारायण बि.माने)
कार्यासन अधिकारी,गृह विभाग.

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई.
संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक,अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रबंधक, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर.
अवर सचिव, वित्त विभाग, अर्थसंकल्प-३, मंत्रालय, मुंबई.
उप सचिव (पोल-१) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अवर सचिव (रोखशाखा/बीयुडी-१) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (आस्था-१),गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.